*धाबा हे ऊर्जा देणारे क्षेत्र – आ. सुधीर मुनगंटीवार*
==========================================

श्री क्षेत्र कोंडय्या महाराज देवस्थानामुळे पवित्र झालेले धाबा हे ऊर्जा देणारे क्षेत्र आहे. या देवस्थान परिसराच्या विकासासाठी 1 कोटी रूपयांचा निधी मी उपलब्ध केला आहे. येत्या काळात धर्मशाळेच्या बांधकामासाठी सुध्दा मी आवश्यक ती मदत करेन. या आधी या परिसरात मी रुग्णवाहिका मी उपलब्ध केली आहे. येत्या दोन महिन्यात स्वर्गरथ सुध्दा उपलब्ध करण्यात येईल. चंद्रपूरात जेव्हाही मी कन्यका मंदीरात जातो तेव्हा कोंडय्या स्वामींचे दर्शन मी प्रथम घेतो. त्यामुळे या देवस्थानावर माझी विशेष श्रध्दा आहे. या देवस्थानाच्या विकासासाठी कटिबध्द असल्याची भावना माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

गोंडपिपरी तालुक्यातील धाबा येथील श्री कोंडय्या महाराज देवस्थान यात्रा परिसराला आज आ. सुधीर मुनगंटीवार यांनी भेट देत नागरिकांशी संवाद साधला. यावेळी त्यांच्यासोबत भाजपा नेते राजेंद्र गांधी, प्रविण पडवेकर, अमर बोडलावार, जि.प. सदस्या वैष्णवी बोडलावार, श्री. पत्तीवारजी आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.